# मनोहर वामन देसाई स.सा. रुग्णालय

हाजीबापूरोड, गोविंदनगर,

मालाड(पू.) मु. नं. ४०००९७.

दूरध्वनी क्र. २८७७७८५७/ २८७७४२१५

**प्रमुख वैद्यकिय अधिकारी डॉ. हरेश सी. गोईमावाला**

## प्रस्तावना

म.वा.देसाई स.सा. रुग्णालय हे हाजी बापु रोड. गोविंद नगर, मालाड(पूर्व) येथे कार्यरत आहे. गोरेगाव (पू.), मालाड (पू.), व कांदिवली (पू.), येथील ११,००,००० लोकवस्ती असलेल्या विभागातील लोक येथील वैद्यकीय सेवेचा लाभ घेतात.

म.वा.देसाई स.सा. रुग्णालय हे प्रथमतः २० खाटांचे प्रसुतिगृह म्हणून १९७६ साली १९७९चौ.मी. जागेवर सुरु करण्यात आले. बाकीचे निरनिराळे विभाग हळुहळु सुरु करण्यात आले आणि अंतिमत विविध वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन रुग्णालयाचा दर्जा १९७५ साला पासून वाढविण्यात आला. मालाड लायन्स क्लबच्या मदतीने ६ खाटांचे नवजात अर्भकांसाठी अति दक्षता विभाग १९८० सालापासुन सुरु करण्यात आले. कान, नाक, घसा व डोळयांच्या विभाग १९९१ सालापासुन सुरु करण्यात आला. म. वा. देसाई स.सा. रुग्णालय हे १६२ खाटांचे असून ईमारतचे बांधकाम क्षेत्रफळ हे २३३६.७५ चौ.मी. आहे.

रुग्णालयाचा आराखडाखालील प्रमाणे

| मजला | विभाग |
|---|---|
| तळ मजला | नोंदणी विभाग<br>औषध विभाग<br>लसीकरण बाहय विभाग<br>व्रणोपचार बाहय विभाग<br>इंजेक्शन विभाग<br>वैद्यकिय/आयुर्वेदिक/होमिओपेथिक बाहय विभाग<br>बालरोग बाहय विभाग<br>स्त्री- रोग/ शल्य चिकित्सा/ अत्यावश्यक बाहय रुग्ण सेवा विभाग<br>क्षयरोग बाहय विभाग<br>कान, नाक, घसा/ अस्थिव्यंग / नेत्र चिकित्सा बाहय विभाग<br>प्रयोगशाळा विभाग<br>क्ष किरण विभाग<br>डॉट सेंटर<br>आरोग्य सेवा केंन्द्र<br>डायलेसिस केंद्र<br>रुग्णवाहिका<br>सुरक्षा रक्षक विभाग<br>राजीव गांधी जीवन दायी योजना |
| पहिला मजला | शस्त्रक्रियागार<br>ह्दयस्पंदनआलेख / सोनोग्राफी<br>प्रसुती कक्ष<br>प्रसुती पुर्व तपासणी विभाग<br>प्रसुती पश्चात तपासणी विभाग<br>नवजात शिशु अतिदक्षता विभाग<br>सोनोग्राफी विभाग |
| दुसरा मजला | प्र.वै.अधिकारी कार्यालय<br>अधिसेविका कार्यालय<br>स्त्री- वैद्यकिय व शल्यकक्ष |

| | |
|---|---|
| | दूरध्वनी केंन्द्र विभाग<br>भौतिकोपचार व्यवसायोपचार तज्ञ विभाग |
| तिसरा मजला | बाल रुग्ण कक्ष<br>पुरुष वैद्यकिय आणि शल्य कक्ष<br>औषध भांडार<br>लिनन भांडार<br>प्रशासकिय कार्यालय |

महाराष्ट् शासन व भारताचे सर्वोच्च न्यायालय यांच्या नियमानुसार जेथे माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सर्व सामान्य जनतेच्या आवश्यक माहितीसाठी हे पुस्तक तयार करण्यात आले आहे.

म.वा. देसाई रुग्णालय येथे उपलब्ध असण-या सेवांची माहिती सर्व सामान्य जनतेला मिळण्याच्या हेतुने ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे. ही पुस्तिका म. वा. देसाई सर्व साधारण रुग्णालय आस्थापना आणि त्याची कार्यप्रणाली यांची परिपुर्ण माहिती पुरविते.

सोबतच्या परिशिष्टात माहितीसाठी संदर्भ दिले आहेत.

उपरोक्त विषयातील अधिक माहितीसाठी यांच्याशी संपर्क साधावा.

1. प्रमुख वैद्यकिय अधिकारी
2. वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी

अधिक माहितीसाठी

1. संबंधित अधिका-यांकडे अर्ज दाखल करावा.
2. प्रमाणित प्रत व टपालखर्च याचे शुल्क आकारले जाईल व त्याची अधिकृत पावती दिली जाईल.